लोकसत्ता पा. नं. १४

# पाळीव प्राण्यांच्या विरहाने तरुणाची आत्महत्या

## मिरा रोड येथील घटना

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** पाळलेल्या दोन मांजरी आणि सरडा घराबाहेर काढण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतल्याने विरह सहन न झाल्याने नैराश्यात गेलेल्या मिरा रोडमधील एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. अनिस कुरेशी (२७) असे या तरुणाचे नाव आहे.

मिरा रोडच्या नया नगर येथे अनिस आपल्या कुटुंबीयांसोबत राहत होता. तो एका बेकरीत काम करत होता. त्याला लहानपणापासून प्राण्यांची आवड होती. त्याने आपल्या घरात दोन मांजरी आणि ईलवाना प्रजातीचा सरडा पाळला होता. मात्र या प्राण्यांमुळे घरात अस्वच्छता व्हायची. सरडा पाळणे कुटुंबीयांना आवडत नव्हते. ते सतत त्याला प्राणी पाळू नको असे सांगत होते. परंतु त्याकडे तो दुर्लक्ष करत होता. या प्राण्यांची तो काळजी घ्यायचा. मात्र त्याच्या कुटुंबीयांनी अनिसचा विरोध डावलून या मांजरी आणि सरड्याला घराबाहेर काढण्याचा निर्णय घेतला. आपण प्रेमाने पाळलेले प्राणी आपल्यापासून दूर जातील, हा विरह आपल्याला सहन होणार नाही या विवंचनेत तो नैराश्यात गेला होता. याच नैराश्यातून त्याने गुरुवारी दुपारी घरात कुणी नसताना गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी नया नगर पोलीस ठाण्यात अपमृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती नया नगर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार निखिल मोरे यांनी दिली.

### प्राणिप्रेमामुळे लग्नालाही नकार

**अनिसला लहानपणापासूनच प्राणी आणि पक्ष्यांवर प्रेम होते. काही महिन्यांपूर्वीच त्याची बेकरीतील नोकरी सुटली होती. या वेळी आपला संपूर्ण वेळ तो या पाळीव प्राण्यांसोबत घालवत होता. तुझ्या होणाऱ्या पत्नीला प्राणी आवडणार नाहीत, अशी भीती त्याचे कुटुंबीय घालत होते. त्यामुळे तो लग्नालाही नकार देत होता, अशी माहिती पोलिसांनी दिली.**

# विधानसभा निवडणुकीसाठी ९२४ वाहने

## परिवहन विभागाकडून तपासणी सुरू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून निवडणूक प्रक्रियेची तयारी सुरू आहे. पालघर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात निवडणूक कामासाठी ९२४ इतक्या वाहनांचे नियोजन करण्यात आले आहे. परिवहन विभागाकडुन मागणी केलेल्या वाहनांची तपासणी करून ती उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

### विधानसभानिहाय वाहने

| मतदार संघ | वाहन संख्या |
|---|---|
| १२८ डहाणू - | १३० |
| १२९ विक्रमगड - | १६२ |
| १३० पालघर - | १४१ |
| १३१ बोईसर - | १६५ |
| १३२ नालासोपारा - | १६० |
| १३३ वसई - | १६६ |
| एकूण | ९२४ |

२० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यात डहाणू, विक्रमगड, पालघर, बोईसर, नालासोपारा आणि वसई या सहा विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मागील महिना भरापासून निवडणुकीची जोरदार तयारी प्रशासनाकडून सुरू आहे. निवडणुकीच्या शासकीय कामकाजासाठी मोठ्या संख्येने वाहनांची आवश्यकता असते. त्यानुसार नियोजन करण्याचे काम सुरू आहे. पालघर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात २८७ झोन २ हजार २७४ इतक्या मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त केलेले अधिकारी-कर्मचारी, ई व्ही एम यंत्रणा यांची मतदान केंद्रावर ने आण करण्यासाठी वाहनांची व्यवस्था केली जाणार आहे त्यांच्यासाठी ९२४ वाहने सज्ज ठेवली जाणार आहेत. यात बस, मिनी बस, जीप, व अन्य गाड्या यांचा समावेश आहे. यात ४१९ बस, १७० जीप, २८७ चारचाकी याशिवाय बोईसर आणि वसई विधानसभा क्षेत्रातील बेटावर गावे आहेत त्याठिकाणी समुद्रातून प्रवास करावा लागतो यासाठी ५ बोटींचे नियोजन केले आहे. त्यासोबत १७ बसेस, २३ जीप, व ३ बोटी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सहा मतदारसंघातून एकूण ९२४ वाहनांची मागणी वसईच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात करण्यात आली असल्याची माहिती परिवहन विभागाने दिली आहे.

परिवहन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र, वाहनाचे आर.सी. पुस्तक, वाहनाचा विमा, वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र, कर भरल्याची पावती, व्यावसायिक वाहन असल्यास वैध परवाना, चालकाचा परवाना, पीयूसी अशा सर्व बाबी तपासणी करून वाहने उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

> जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीच्या कामासाठी लागणाऱ्या वाहनांची परिवहन कार्यालयात मागणी केली होती. त्यानुसार वाहनांची तपासणी करून ती वाहने उपलब्ध करून दिली जाणार आहेत.
> **-अतुल आदे,** प्रादेशिक परिवहन अधिकारी वसई

# पोलिसांच्या दक्षतेमुळे चिंचोटी धबधबा दुर्घटनामुक्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई, विरारमधील पावसाळ्यात पर्यटन स्थळांच्या ठिकाणी दरवर्षी विविध दुर्घटना समोर येत असतात. अशा दुर्घटना रोखण्यासाठी यंदा चिंचोटी धबधब्याच्या ठिकाणी नायगाव पोलिसांनी बंदी घालत विविध उपाययोजना आखल्या होत्या त्यामुळे यंदा एकही दुर्घटना घडली नाही.

नायगाव पूर्वेच्या चिंचोटी येथे असलेल्या डोंगरावर पावसाळ्यात धबधबा तयार होतो. त्यामुळे तेथे मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. मात्र हे ठिकाण पावसात धोकादायक ठरत असते. काही पर्यटक या ठिकाणी येऊन हुल्लडबाजी करतात. तर काहीजण मद्यपान करूनही पाण्यात उतरण्याचा प्रयत्न करतात. दरवर्षी पावसाळ्यात चार ते पाच जणांचा धबधब्याच्या डोहात बुडून मृत्यू होत असतो. मागील वर्षी जुलै महिन्यातच चार तरुणांचा बुडून मृत्यू झाला होता. चार ते पाच वर्षांपूर्वी याच धबधब्याच्या ठिकाणी पाण्याचा प्रवाह वाढल्याने अडकून पडले होते. त्यांना हेलिकॉप्टरच्या मदतीने बाहेर काढावे लागले होते. अशा घटना घडू नये यासाठी जिल्हा प्रशासन व पोलीस यांच्यामार्फत बंदी घातली जाते. मात्र तरीसुद्धा छुप्या मार्गाने पर्यटक त्या ठिकाणी जात असतात. यावर्षी पावसाळा सुरू होताच नायगाव पोलिसांनी त्याठिकाणी सूचना फलक लावण्यात आले होते. याशिवाय शनिवार, रविवारी या सुट्टीच्या दिवसांत पथक नियुक्त करून त्याठिकाणी गस्त वाढविली होती. सातत्याने त्या ठिकाणच्या पर्यटनाच्या ठिकाणी विशेष लक्ष दिले होते. त्यामुळे यंदा एकही दुर्घटना या ठिकाणी घडली नसल्याची माहिती नायगाव पोलिसांनी दिली आहे.

धबधब्याच्या ठिकाणी जाणारी पायवाट अरुंद आहे. दगडांवर शेवाळ साचल्याने ते निसरडे होऊन खाली पडण्याची शक्यता असते. धबधब्याचा डोह खोल असून पाण्याचा प्रवाह असल्याने पट्टीचे पोहणारे देखील बुडत असतात. त्यामुळे येथे पर्यटकांनी जाऊ नये असे आवाहन केले होते. वरिष्ठांनी दिलेल्या सूचनेनुसार गस्त ही ठेवली होती. त्यामुळे एकही दुर्घटना घडली नाही, असे नायगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बलराम पालकर यांनी सांगितले आहे.

पुढारी पु. पा. ४.


# उत्तन घनकचरा प्रकल्पाचा तिढा तसाच!

## स्थानिकांच्या मागणीचा लोकप्रतिनिधींसह पालिकेला विसर

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर महापालिकेचा उत्तनच्या धावगी-डोंगर येथील घनकचरा प्रकल्पात टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यातून दुर्गंधीसह बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचा त्रास आसपासच्या रहिवाशांना होत आहे. हा कचरा ज्या ठिकाणी बांधकाम सुरु आहे त्याठिकाणच्या भरणीसाठी उपलब्ध करून देण्याची संकल्पना दरम्यानच्या काळात पुढे आली. मात्र त्याचा विसर लोकप्रतिनिधींसह पालिकेला पडल्याने प्रकल्पात २०१६ पूर्वी साठलेला कचरा हटविण्यात अद्यापही सुरुवात न झाल्याने या घनकचरा प्रकल्पाचा तिढा सुटणार केव्हा, असा प्रश्न स्थानिकांकडून यंदाच्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने उपस्थित होऊ लागला आहे.

पालिकेने २००५ मध्ये स्थानिकांचा विरोध डावलून उत्तनच्या धावगी-डोंगर येथे घनकचरा प्रकल्प सुरु केला. त्यावेळी शहरातून जमा होणारा सुमारे ४५० मेट्रिक टन कचरा एकत्रिपणे प्रकल्पात टाकला जात असे. हा प्रकल्प डोंगराळ परिसरात आहे. प्रकल्पात कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया होत नसल्याने त्यातून बाहेर पडणारे सांडपाणी खालील लोकवस्त्यांमध्ये, तेथील पाण्याच्या स्रोतात, शेतांमध्ये तसेच लगतच्या समुद्रात वाहून येते. यामुळे परिसरात मोठ्याप्रमाणात प्रदूषण होत असतानाच त्यातून सुटणाऱ्या



दुर्गंधीमुळे येथील बहुतांशी लोकांना श्वसनाचा विकार जडल्याचा दावा स्थानिकांकडून केला जात आहे. यामुळे या प्रकल्पाला इतर ठिकाणी स्थलांतर करण्याची मागणी स्थानिकांनी सुरु करीत अनेकदा आंदोलने छेडली. त्यासाठी प्रशासनाकडून देखील प्रयत्न करण्यात आले. यानंतरही हा प्रकल्प त्याच ठिकाणी सुरु आहे. या प्रकल्पात सुरुवातीपासून २०१६ पर्यंत टाकण्यात आलेल्या लाखो मेट्रिक टन कचऱ्याचा डोंगर उभा राहिला असून त्याला उन्हाळ्यात पारा वाढला कि आग लागण्याची घटना घडते. आणि त्याच्या धुराचे लोट परिसरात उठतात. यामुळे तेथील लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असतानाच या कचऱ्यातून बाहेर पडणारे सांडपाणी देखील येथील लोकांच्या मुळावर उठल्याचे बोलले जात आहे. पालिकेने काही वर्षांपूर्वी या कचऱ्यावर बायोमायनिंगची प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावण्याकरीता राज्य शासनाने पालिकेला सुमारे ४८ कोटींचा निधी वर्ग केला. यात कचऱ्याच्या गाड्यांसह इतर साहित्यांचा देखील समावेश आहे. या निधीच्या खर्चातून पालिकेने ठेकेदाराची नियुक्ती केली खरी पण ठेकेदाराकडून बायोमायनिंगची प्रक्रिया पूर्णच केली जात नव्हती. त्याची गंभीर दखल आयुक्त संजय काटकर यांनी घेत बायोमायनिंगचा ठेका रद्द केला. परिणामी प्रकल्पात साठलेल्या कचऱ्याच्या दुर्गंधीचा तसेच त्यातून वाहणाऱ्या सांडपाण्याचा त्रास येथील रहिवाशांना होत आहे.

दरम्यान २०१६ नंतर पालिकेने घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अंतर्गत ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण सुरु केले असून जमा होणाऱ्या ओल्या कचऱ्यापासून कंपोष्ट खत तयार करण्यास सुरुवात केली. मात्र वर्षानुवर्षे प्रकल्पात पडून राहिलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावून प्रकल्प इतरत्र स्थलांतर करण्याच्या मागणीसाठी उत्तनमधील रहिवाशांनी उच्च धारावी बेट संघर्ष समितीच्या माध्यमातून न्यायालयाच्या निर्देशानुसार हरित लवादाकडे दावा दाखल केला. दरम्यान पालिकेने वसई तालुक्यातील सकवार येथे घनकचरा प्रकल्पासाठी महसूल विभागाची जागा घेतली. या प्रकल्पाला विरोध दर्शविल्यानंतर पालिकेकडून येथील प्रकल्प सुरु करण्यात आला नाही. तर हरित लवादाने उत्तनचा प्रकल्प सकवार येथे स्थलांतर करण्याचे निर्देश पालिकेला दिले.

**● पालिका आयुक्त संजय काटकर यांनी त्याला सहमती दर्शवित त्याची जबाबदारी महसूल विभागाकडे सोपविण्यात आली. यामुळे उत्तनकरांचा त्रास कमी होण्याची चिन्हे निर्माण झाली आहे. यामुळे येथील घनकचरा प्रकल्पाचा तिढा सुटण्याकडे स्थानकांचे डोळे लागले असून हा तिढा सुटणार केव्हा, असा प्रश्न त्यांच्याकडून यंदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपस्थित होऊ लागला आहे.**

---

पुढारी पु-पा-१.

# देशाचे संरक्षण मंत्री राजनाथसिंह आज वसईमध्ये

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

देशाचे संरक्षण मंत्री राजनाथसिंह हे आज वसईमध्ये येणार असून ते महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचार सभा घेणार आहेत. त्यांच्या समवेत गुजरात राज्याचे गृह राज्यमंत्री हर्षभाई सिंघवी हे सुद्धा प्रचारासाठी वसईत येणार आहेत. भाजपा महायुतीच्या १३३ वसई विधानसभा उमेदवार ॲड. स्नेहा दुबे-पंडित यांच्या प्रचार सभेत राजनाथ सिंह आणि हर्षभाई सिंघवी हे आज दुपारी अडीचच्या सुमारास सहभागी होणार आहेत. कल्पतरू मैदान कालिमाता मंदिरासमोर ६० फूट रोड दिवाणमान वसई (पश्चिम) येथे ही प्रचार सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेला नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे. तर या सभेला महायुतीचे सर्व मान्यवर नेते उपस्थित राहणार आहेत, असे महायुतीच्या सर्व घटक पक्षाचे प्रमुख महेंद्रा पाटील यांनी सांगितले आहे.

पुण्यनगरी पा.नं. ७

# महानगरपालिकेकडून नाला बुजवण्याचा प्रताप?

## नागरिकांकडून आरोप, सांडपाण्याचा धोका



। **वसई** : पावसाळी पाण्याचा निचरा करणारी सोपारा खाडी विकासकांनी अर्धी बुजवल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.तर सांडपाण्याचा निचरा करणारा नाला बुजवण्याचा प्रताप खुद्द वसई-विरार महापालिकेने केल्याचा आरोपही नागरिकांकडून होत आहे.त्यामुळे सांडपाणी रस्त्यावर पसरून रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

वसई-विरारमधील हवा दुषीत झाल्यामुळे श्वसन आणि डोळयांच्या विकारात वाढ होत चालली असताना,त्यावर कोणत्या उपाययोजना कराव्यात याचा विचार करण्याऐवजी नागरिकांचे आरोग्य आणखी कसे बिघडेल असा प्रकार वसई-विरार महापालिकेने केल्याचे उघड झाले आहे. वसई-विरार परिसरातील हवेची गुणवत्ता २०२४ च्या सुरुवातीपासूनच ढासळत चालली आहे.कालबाह्य झालेली विषारी धुर ओकणारी वाहने आणि फटाक्यांच्या प्रदुषणामुळे त्यात वाढ झाली आहे. प्रदूषणातील वायुमुळे श्वसन,घसा तसेच श्वासोच्छवासाचा त्रास मुलांना होऊ लागला आहे, अशा बिकट परिस्थितीत इमारतीचे सांडपाणी वाहून नेणारा नाला बंद करण्याचा प्रताप महापालिकेने केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.नालासोपारा-विरार मधील म्हाडा रोड लगत अनेक टॉवर उभारण्यात आले आहेत.त्यातील सांडपाणी वाहून नेणारा नाला भराव टाकून बुजवण्याचे काम मंगळवारी दुपारी सुरु होते. सदनिकांमधून येणारे सांडपाणी वाहून नेणारे नाले बंदिस्त आणि रुंद होणे गरजेचे असताना.ते बंद करण्याचा घाट पालिकेमार्फत घालण्यात आला होता. ही बाब प्रदेश कॉंग्रेसचे सचिव कॅप्टन निलेश पेंढारी यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी तत्काळ भरावाचे काम थांबवले.नाले आणि रस्ते, शहराच्या सुदृढ रक्तवाहिन्या असतात.त्या रक्तवाहिन्याच गोठण्याचा प्रकार स्वतः महापालिकेकडून केला जात होता. हे प्रकरण पालिका आयुक्तांच्या कानावर घालण्यात आले असून,त्यांच्यात नितीमत्ता आणि प्रामाणिकपणा थोडा जरी जिवंत असेल तर नाल्यांना अतिक्रमण मुक्त करून,दोषी लोकांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा असे आवाहन पेंढारी यांनी केले आहे.

---

# राजन नाईक यांच्या बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद



। **विरार** : 'भारत माता की जय, जय श्रीराम' अशा देशभक्तीपर गगनभेदी घोषणांनी परिसर निनादून सोडत 'नालासोपारा-विरारच्या परिवर्तनासाठी राजन नाईक यांना बहुमतांनी निवडून द्या,' असे आवाहन महायुतीच्या कार्यकर्त्यांनी केले. नालासोपारा विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार राजन नाईक यांच्या प्रचारासाठी शुक्रवारी सकाळी बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत महायुतीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या प्रचार रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या रॅलीची सुरुवात ९ वाजता विरार-चंदनसार येथील आर. के. हॉटेल येथून झाली. त्यानंतर येथील बौद्धवाडा, तांदूळ बाजार, कोपरी, कोपरी-शनिमंदिर, गासकोपरी, केशवनगर, साईनाथ नगर, भानुवाडी, वैष्णवी नगर, पाचपायरी, बेगर्स होम, पोस्ट ऑफिस, गणपती मंदिर, साईदत्त झोपडपट्टी, चांमुडा नगर, कोकण नगर, विजय नगर परिसर, राम कम्पाऊंड, गोपचरपाडा, एअर इंडिया परिसर, काळा हनुमान, जीवदानी रोड, वरद विनायक लेन परिसर हिल पार्क, जीवदानी क्रॉस रोड अशी मार्गक्रमणा या रॅलीने केली. ठिकठिकाणी या रॅलीचे स्वागत करून लाडक्या बहिणींनी राजन नाईक यांचे औक्षण केले.

दरम्यान, दुपारनंतर सहकार नगर, फुलपाडा, रामचंद्र नगर, गांधी चौक, गुरुदत्त नगर, नाना-नानी पार्क, मनवेलपाडा-कारगिल नगर, संतनगर मार्गे विरार पूर्व रेल्वे स्टेशन परिसरात या रॅलीच्या माध्यमातून राजन नाईक यांनी नागरिक, दुकानदार, व्यापारी आणि अन्य प्रवाशांसोबत संवाद साधला. त्यांच्या समस्या-अडचणी समजून घेत त्या सोडवण्याचे आश्वासन दिले. या रॅलीचा समारोप रात्री ९ वाजता स्थानक परिसरात झाला. या रॅलीत महायुतीचे उमेदवार राजन नाईक यांच्यासोबत शिवसेना (ठाकरे) तालुकाप्रमुख सुदेश चौधरी व अन्य पदाधिकारी - कार्यकर्ते सहभागी झाले होते.

म. टा. पु. ५१. १.

# ‘त्या दोघांची लढाई सत्ता व पैशांसाठी’

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

'एकाने मिरा-भाईंदरला पाच वर्षांत लुटून खाल्ले. दुसऱ्याने तर लुटीचा कहरच केला आहे. या दोघांमधील लढाई ही स्वतःच्या स्वार्थासाठी आहे. त्यांना केवळ सत्ता, पैसे आणि स्वतःचा बांधकाम व्यवसाय दिसतो. या दोघांच्याच कंपन्या शहरात इमारत पुनर्विकासाचे काम करत आहेत,' अशी टीका काँग्रेसचे उमेदवार मुझफ्फर हुसेन यांनी गुरुवारच्या सभेत कोणाचेही नाव न घेता विरोधकांवर केली.

## हुसेन यांची विरोधकांवर टीका



भाईंदर पश्चिमेच्या बावन जिनालय मंदिराजवळ महाविकास आघाडीकडून गुरुवारी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हुसेन यांनी मतदारांना साद घातली. 'आमची लढाई ही स्वार्थासाठी नसून शहराला वाचवण्याची आहे. आम्ही शहर उभारले आहे, विकसित केले आहे. आम्ही कधीच जाती-धर्माच्या मुद्द्यावर शहराला विभागण्याचे काम केले नाही. सर्व जाती-धर्मांचे लोक हे भारतीय आहेत. असे असताना धर्माच्या नावावर विभाजन करण्याचे काम त्यांच्याकडून केले जात आहे,' असा घणाघात त्यांनी केला.

'तुम्ही देशाची राज्यघटना मानत नसाल, तर तुम्हाला लोकप्रतिनिधी होण्याचा मुळीच अधिकार नाही. शहराच्या विकासासाठी मी निवडणूक लढवत आहे. कोणत्या मंदिराचा पुजारी, मशिदीचा मौलाना किंवा चर्चच्या फादरची नोकरी मिळावी म्हणून निवडणूक लढवत नाही. त्यांची पालिकेत, राज्यात आणि केंद्रात सत्ता असताना अनेक स्थानिक अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. शहरात अतिरिक्त पाणी व इतर कामे झालेली नाहीत. कर आकारणी मात्र केली जात आहे. निवडणूक दिलेले लोकप्रतिनिधी काय करत आहेत?, असे जनता विचारत आहे. गेल्या दहा वर्षांत त्यांनी केवळ जनतेला लुटले असून पुढेही तेच करणार आहेत,' अशा शब्दांत त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

# विष प्राशन करून दोघांची आत्महत्या

▮ वसई : विष प्राशन करुन दोघांनी आत्महत्या केल्याच्या दोन वेगवेगळ्या घटना नालासोपारात घडल्या आहेत. नालासोपारातील यशवंत गौरव येथील आनंद हाईट्स मध्ये राहणारे निपेश चंदर (५५) यांना किडनीचा आजार होता.या आजाराला कंटाळून त्यांनी उंदीर मारण्याचे औषध पिऊन आत्महत्या केली.त्यांना उपचारासाठी ओझोन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. तिथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.याप्रकरणी आचोळे पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.दुसऱ्या घटनेत नालासोपारा पश्चिमेकडील गास-कांदोक येथे राहणारे विलास गोन्सालविस (४८) यांनी विष पिऊन आत्महत्या केली. उपचारासाठी वसईच्या डिसोझा हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करण्यात आले होते.मात्र त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.नालासोपारा पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

लोकमत पु. पा. ४.

# दोन वेगळे मतदान कार्ड, तर कारावास होईल राजा!

## कार्ड असणे अतिशय महत्त्वाचे : भारतीय असल्याची ओळख

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघांसाठी बुधवार, २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. मतदानाचा अधिकार असलेल्या व्यक्तीकडे मतदारकार्ड असणे अतिशय महत्त्वाचे आहे. मात्र, एखाद्या व्यक्तीकडे कोणत्याही कारणामुळे दोन मतदान कार्ड असतील तर तो गुन्हा मानला जाणार आहे.

मतदान कार्ड हा तुम्ही भारतीय रहिवासी असल्याची ओळख आणि पत्त्याचा पुरावा म्हणून गृहीत धरले जाते. नोंदणी दरम्यान झालेल्या चुकांमुळे किंवा पत्ता बदलल्यानंतर काही जणांकडे दोन कार्ड असतात. परंतु, एखाद्या व्यक्तीकडे दोन किंवा अधिक मतदारकार्ड असणे हा गुन्हा मानला जातो. वेगवेगळ्या ठिकाणांहून दोन मतदार ओळखपत्रे असलेला नागरिक आढळल्यास त्याला एक वर्षापर्यंत कारावास किंवा दंड होऊ शकतो.



### दोन वेगवेगळे मतदान कार्ड असणे कायद्याने गुन्हा

एखाद्याकडे दोन किंवा अधिक मतदान कार्ड असणे हा गुन्हा मानला जातो. कायदेशीररीत्या एखादी व्यक्ती एकापेक्षा जास्त मतदान कार्ड बाळगू शकत नाही. जर दोन मतदारकार्ड असेल तर सावध होण्याची गरज आहे. कारण संबंधितांना मोठ्या कारवाईला सामोरे जावे लागते.

### नको असलेले कार्ड करा रद्द

जे कार्ड नको असेल ते रद्द करण्याची सुविधा ऑनलाइन आणि ऑफलाइन उपलब्ध आहे. नवीन मतदान कार्ड मिळविता येते किंवा त्यात दुरुस्ती करू शकता. अर्ज केल्यानंतर नको असलेले मतदान कार्ड रद्द करता येते.

### कारवाई होऊ शकते

ज्या मतदारांची नावे दोन वेगळ्या मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत, तसे असल्यास ते त्वरित रद्द करा, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागू शकते. एवढेच नाही तर तुरुंगाची ही हवा खायला लागेल.

### गावाकडे अन् शहरातही दोन-दोन कार्ड

- अनेकांना त्यांच्या कायमस्वरूपी आणि तात्पुरत्या पत्त्यांवरून बनविलेले मतदान ओळखपत्र मिळते. एखादी व्यक्ती एखाद्या ठिकाणी राहत असेल तर त्याला त्या जागी बनविलेले मतदार ओळखपत्र मिळते.
- तीच व्यक्ती नंतर नोकरी किंवा इतर कारणांमुळे दुसऱ्या ठिकाणी बदली होते. परंतु, पहिले मिळालेले मतदान कार्ड रद्द केले जात नाही, तर दुसऱ्या ठिकाणी मात्र दुसरे मतदान कार्ड काढले जाते. त्यामुळे गावाकडचे आणि शहरातले असे दोन-दोन कार्ड काहीजणांकडे असते.



लोकमत ५.५.१.

वसईकरांना आश्वासनांचे गाजर

# मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल ठरतोय फक्त निवडणूक मुद्दा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे मनपाच्या शासकीय रुग्णालयांची सेवा ढासळत चालली आहे. प्रत्येक निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे उमेदवार जनतेसाठी मल्टिस्पेशालिटी रुग्णालये बांधण्याचे आश्वासन देतात, मात्र निवडणुका संपल्या की दिलेली आश्वासने विसरली जातात, असा अनुभव वसईकरांना येत आहे.

वसई पूर्वेतील २०० खाटांच्या शासकीय रुग्णालयाची पायाभरणी दोन वेळा झाली असून, अर्थसंकल्पीय निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे, मात्र आजतागायत रुग्णालयाच्या बांधकामाला सुरुवात झालेली नाही. आता या विधानसभा निवडणुकीत जनतेला स्वस्त आणि चांगले वैद्यकीय सुविधा देणारे इस्पितळ उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन दिले जात आहे.

उपलब्ध असलेल्या पालिकेच्या इस्पितळांमध्ये डॉक्टर, कर्मचारी आणि साधनसामग्रीची कमतरता आहे. यामुळे खासगी रुग्णालयांचा फायदा होत आहे. सुमारे ३० लाख लोकसंख्या असलेल्या वसई-विरारमध्ये दोन सरकारी रुग्णालये आहेत. नालासोपारा येथे विजयनगर आणि वसई पश्चिम येथे सर डीएम पेटिट हॉस्पिटल आहे. या दोन्ही रुग्णालयांमध्ये डॉक्टर, कर्मचारी आणि साधनसामग्रीची कमतरता असल्याने येथे येणाऱ्या रुग्णांना योग्य उपचारही मिळत नाहीत.



## रुग्णांना जावे लागते मुंबईतील रुग्णालयांत

- रुग्णांना आजही मुंबईतील मोठ्या रुग्णालयात उपचारासाठी जावे लागत आहे. रुग्णांसह रुग्णाच्या नातेवाईकांना यामुळे अतोनात हालअपेष्टांना सामोरे जावे लागते. मात्र प्रशासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधी यांना त्याचे सोयरसुतक नाही.
- मनपा क्षेत्रातील करदात्यांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी मनपा प्रशासनाकडून आरोग्य सेवेत सुधारणा होत नाही. रुग्णालयातील सोनोग्राफी आणि क्ष-किरण मशीन अनेक महिने बंद असतात.

## मंजुरी मिळूनही खोळंबा

१ रिपोर्ट काढण्यासाठी रुग्णांना खासगी सेवेतून जादा पैसे मोजावे लागतात. काही औषधे सोडली तर सर्व औषधे बाहेरून पदरमोड करून खरेदी करावी लागतात.

२ मागील ३५ वर्षांत आरोग्य सेवेची ही दयनीय अवस्था अजूनही कायम आहे. या स्थितीची दखल मानवाधिकार आयोगाने घेत राज्य सरकारच्या आरोग्य विभागास आणि मनपाला फटकारले आहे.

३ यानंतर शासनाने अंदाजपत्रकाची रक्कम मंजूर करून रुग्णालयाच्या बांधकामाला मंजुरी दिली.

४ १० जुलैला पुन्हा हॉस्पिटलची पायाभरणी करण्यात आली. चार महिने उलटून गेले तरी या प्रलंबित रुग्णालयाचे काम सुरू झालेले नाही.

लोकमत ५-५१-१.



पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना अवैध दारू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य जप्त करून नष्ट करण्यात आले.

# गावठी दारू अड्ड्यावर पेल्हार पोलिसांचा छापा

## गुन्हा दाखल : लाखोंचा मुद्देमाल नष्ट

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अवैध गावठी दारू तयार होण्याच्या ठिकाणी छापा मारून लाखो रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला आहे. पेल्हार पोलिसांनी याप्रकरणी आरोपी महिलेवर गुन्हा दाखल केला आहे.

पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन कांबळे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकासह गुरुवारी रिचर्ड कंपाउंड येथील मनीचापाडा येथे अवैध दारू तयार होत असल्या ठिकाणी छापा टाकला. तेथील अवैध गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य जप्त करून अवैध गावठी दारू तयार करणाऱ्या महिलेवर कारवाई करण्यात आली.

अवैध दारूसाठी लागणारे साहित्य मिळून आल्याने सदरचे मिश्रण, दारू, ड्रम जागीच नष्ट करण्यात आले आहे. तसेच गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे मिश्रण, झारा, नरसाळे, टोप गुन्ह्याच्या तपासकामी जप्त केले आहे. या ठिकाणी अनुसया शिंगडा (वय ६५) ही महिला दारू बनवत होती, पण तिला पोलिसांची चाहूल लागताच ती जंगलात पळून गेली.

### पोलिसांनी घटनास्थळी जप्त केलेला मुद्देमाल

या ठिकाणी १ लाख १२ हजार रुपये किमतीचे प्लास्टिकचे ३१ निळ्या रंगाचे १,६०० लिटर गावठी दारु तयार करण्याचे मिश्रणचे प्लास्टिक बॅरल, ३० हजारांची ३०० लीटर गावठी दारु, ७ हजार ८०० रुपये किमतीचे ३१ बॅलर, १ हजार ३०० रुपयांचे १३ प्लास्टिक ड्रम, ४ हजारांचे दारु तयार करण्याचे २ लोखंडी ड्रम, १ हजारांचे एक ॲल्युमिनियम टोप, १ प्लास्टिक नरसाळे, एक लाकडी मूठ असलेला झारा, १८० रुपयांचा ३० किलो काळा गूळ, १०० रुपयांचा १० किलो नवसागर असा एकूण १ लाख ५६ हजार ४९० रुपये किमतीचा मुद्देमाल सापडला.

# लाखोंची घरफोडी



नालासोपारा : यशवंत गौरव येथील म्हाडा लिंक रोडवरील संकल्प बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या वैशाली जाधव (३०) यांच्या घरी २१ सप्टेंबर ते १० नोव्हेंबरच्या दरम्यान लाखोंची घरफोडी झाली आहे.

चोरट्यांनी त्यांच्या हॉलमधील कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवलेल्या ६० हजारांच्या सोन्याच्या अंगठ्या, १२ हजारांचे मंगळसूत्र, २ लाख १० हजारांचे मंगळसूत्र आणि ५४ हजारांची सोन्याची चेन असे एकूण ३ लाख ३६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरट्याने त्यांच्या उघड्या घराच्या दरवाजातून चोरून नेले आहे, नालासोपारा पोलिसांनी गुरुवारी तक्रार आल्यावर गुन्हा दाखल केला आहे. नालासोपारा पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# तीन नोकरांनी केली चोरी

नालासोपारा : वसईच्या धुमाळनगर येथील सागर इंडस्ट्रीयल इस्टेटच्या गाळा नंबर ८ मध्ये असलेल्या सौम्या इंडस्ट्रीजमध्ये तीन नोकरांनी चोरी केली आहे. ५ ते ७ नोव्हेंबरच्या दरम्यान कंपनीतून राकेश कनोजिया, फरहान खान आणि झिहान खान या तीन कामगारांनी स्वतःच्या फायद्यासाठी १ लाखाचे १०० मोबाइल कॉन्टक्टचे पार्ट व १ लाख रुपयांचे कॉपर आणि सिल्व्हर वायरचे १० बंडल असा एकूण २ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे. व्यापारी सुरेश यादव (३४) यांनी गुरुवारी वालीव पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

# गळफास घेऊन आत्महत्या



नालासोपारा : नवजीवनच्या शांतीवन इंदिरा वसाहत येथे राहणाऱ्या राजेश पटेल (३६) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी गुरुवारी घरातील लोखंडी अँगलला ओढणीच्या साह्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. शेजारच्यांनी पेल्हार पोलिसांना फोन करून कळवल्यावर त्यांनी घटनास्थळी येऊन उपचारासाठी रुग्णवाहिकेने मनपाच्या हॉस्पिटलमध्ये नेले. तेथील डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. पेल्हार पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

N.B.T. पा- नं. 9.

# नाबालिग पत्नी से बिना सहमति संबंध रेप: बॉम्बे हाई कोर्ट

■ पीटीआई, मुंबई : बॉम्बे हाई कोर्ट ने 18 वर्ष से कम उम्र की पत्नी के साथ बिना सहमति के यौन संबंध बनाने को बलात्कार करार दिया। इस अपराध के लिए 10 साल कैद की सजा पाने वाले व्यक्ति की दोषसिद्धि को बरकरार रखा। जज जी. ए. सनप की नागपुर बेंच ने 12 नवंबर को पारित एक आदेश मे 24 वर्षीय व्यक्ति की उस याचिका को खारिज कर दिया, जिसमे सेशन कोर्ट के 2021 के फैसले को चुनौती दी गई थी। सत्र अदालत ने आरोपी को अपनी नाबालिग पत्नी का यौन उत्पीड़न करने के मामले मे यौन अपराधो से बच्चो के संरक्षण अधिनियम और भारतीय दंड संहिता के प्रावधानो के तहत दोषी ठहराया था और उसे 10 साल कारावास की सजा सुनाई थी। याचिकाकर्ता ने दावा किया कि चूंकि महिला उसकी पत्नी है, इसलिए उनके बीच यौन संबंध को रेप नही कहा जा सकता। हाई कोर्ट ने कहा, '18 साल से कम उम्र की लड़की के साथ यौन संबंध बनाना रेप है, चाहे वह शादीशुदा हो या नही। अठारह साल से कम उम्र की पत्नी के साथ बिना सहमति के यौन संबंध बनाना बलात्कार है।'

**10 साल कैद की सजा पाने वाले व्यक्ति की दोषसिद्धि को कोर्ट ने रखा बरकरार**

महिला ने 2019 मे दर्ज शिकायत मे कहा कि वह आरोपी के साथ रिश्ते मे थी।



उसके मना करने के बावजूद उसने रेप किया। बाद मे दोनो ने शादी की, लेकिन व्यक्ति ने गर्भपात कराने पर जोर दिया। महिला ने आरोप लगाया कि व्यक्ति ने शादी के नाम पर उसके साथ कई बार बलात्कार किया तथा उसे शारीरिक रूप से प्रताड़ित किया। कोर्ट ने कहा कि महिला ने एक बच्चे को जन्म दिया और डीएनए जांच के अनुसार, आरोपी और महिला जैविक माता-पिता है। व्यक्ति ने अपनी याचिका मे स्वयं को निर्दोष बताते हुए कहा कि शिकायतकर्ता उसकी पत्नी है, इसलिए उनके बीच शारीरिक संबंध को बलात्कार नही कहा जा सकता और ये संबंध सहमति से बने थे। उसने यह भी दावा किया कि कथित घटना के समय महिला नाबालिग नही थी। हालांकि कोर्ट ने इस दलील को स्वीकार करने से इनकार कर दिया।